# शेतकरी संघटक

पाक्षिक

आंदोलन विशेषांक - २

वार्षिक वर्गणी रु. ३०

किंमत १ रुपया २५ पैसे

वर्ष ९ वे | २१ नोव्हेंबर १९९२ | अंक १६ वा


# गव्हाच्या आयातीचे गौडबंगाल


— शरद जोशी


**त्यांना समजत नाही.....**

गेल्या पंधरा दिवसांत गव्हाच्या आयातीच्या प्रश्नाबद्दल अनेकांशी चर्चा केली. देशभर अयोध्या प्रश्नावर वादळ उठलेले आहे. हर्षद मेहता अजूनही वर्तमानपत्रांच्या पहिल्या पानावर जागा अडवून आहे. नाईक-पवार लठ्ठालठ्ठीत कोणाची सरशी होते याकडे लोक उत्कंठतेने पाहात आहेत. गव्हाच्या आयातीमागे काही एक मोठे संकट उभे आहे याची जाणीव कोणालाच नाही. पत्रकार, कारखानदार, दुसरे काही डॉक्टरवकील मित्र यांना मी सांगितले की, ''देशात अन्नधान्याच्या तुटवडा नाही हे पंतप्रधानही मान्य करतात पण तरीही सरकारी भावाने शेतकऱ्यांनी जरुरी इतका गहू सरकारला विकला नाही म्हणून हे शासन आयात करते आहे. भारतासारखा दरिद्री देश आपल्या बजेटातून कॅनडा, अमेरिका, यांसारख्या श्रीमंत देशांतील शेतकऱ्यांची धन करीत आहे; देशातील खरेदी किंमतीपेक्षा जवळ जवळ दुप्पट भाव देऊन गव्हाची आयात करीत आहे. परकीय चलनाचे महासंकट कोसळलेले असतांना दीडदोन हजार कोटी रुपये या वेडाचारावर सरकार खर्च करीत आहे आणि हे सगळे खुल्या अर्थव्यवस्थेचा उद्‌घोष करीत होत आहे.'' हे सगळे विस्ताराने सांगितले म्हणजे ऐकाणारालाच मोठा अचंबा वाटतो. एखाद्या नाटकातील खलपुरुषास शोभून दिसेल असले हे कुटील कारस्थान सरकार करीलच कसे हे त्यांना समजत नाही!

**विषारी आयात**

गहू आयातीचा मागचा इतिहास पाहिला म्हणजे, या आयातीने उत्पादक शेतकरी तात्काळ नरम पडतात, ही गोष्ट खरी. काय करतील बिचारे? गावात गाडगी, मडकी, डबे घेऊन दुकान घालणारा वाणी शेतकऱ्यांना लुटतो अशी हाकाटी असते. पण, मायाबाप सरकारच दोनदोन हजार कोटी रुपयांचा माल महागात आयात करून स्वस्तात विकू लागले तर त्याच्यापुढे शेतकऱ्यांचा काय इलाज चालणार आहे? पण, या आयातीच्या विषाने देशही हळूहळू मरतो, शेतीउत्पादन कमी होते आणि देश आयातीवर कायमचा परावलंबी होतो हा नेहरूकाळात घेतलेला प्रत्यक्ष अनुभव आहे. लालबहादूर शास्त्रींनंतर आयात कमी कमी करत, आम्ही संपवली. आता हे विष पुन्हा घेण्याची शासनाला आणि देशाला अवदसा का आठवली?

गव्हाचे पीक गेल्या वर्षीच्या तुलनेने वरचढच आहे. पण तरीही समजू या की ते देशाला पुरेसे नाही. मग, आर्थिक अरिष्टाच्या काळात गहू आयात करण्यापेक्षा देशातील ज्वारी बाजरीचा वापर करणे काही अशक्य नव्हते. शास्त्रीजींनी सगळ्या देशाला एक उपवास करण्याचा आदेश दिला. असे करायला हिम्मत लागते. नव्या पंतप्रधानांना देशाच्या आर्थिक संकटात गव्हाचा तुटवडा ज्वारी बाजरी वापरून भरून काढा असे सांगणे सहज शक्य होते. यंदा ही धान्ये मुबलक पिकली आहेत. त्यांचे भाव कोसळत आहेत.

महाराष्ट्रातील ज्वारी उत्पादक शेतकरी हैराण झाला आहे. विलायतेतील शेतकऱ्यांकडे सोडलेल्या गंगेचा एक लहान पाट जरी ज्वारी – शेतकऱ्याकडे वळला असता तर त्यांचे जन्माचे दारिरयर फिटले असते. किंवा, गव्हाचा तुटवडा होणार आहे, देश आर्थिक संकटात आहे म्हणून विशिष्ट उत्पन्न – गटावरील लोकांना शिधापत्रिकेवर गहू मिळणार नाही, त्यांनी गहू बाजारातून घ्यावा असे पंतप्रधान आवाहन करू शकले असते आणि त्याला देशप्रेमी नागरिकांनी प्रतिसादही दिला असता. परिणामी, गव्हाच्या पुरवठ्यावरील ताण कमी झाला असता.

पण, सरकारने यापैकी काही केले नाही. गहू आणला. गहू पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना धडा शिकवायचे ठरवून आणला. यामुळे पंजाबमधील शेतकरी संतापला तरी चालेल असा हिशोब करून गहू आणला. पंजाबमधील परिस्थिती थोडी थंडावते आहे एवढ्यातच शेतकऱ्यांना धडा शिकविता येईल असा आडाखा बांधून आयात झाली.

**प्रयोजन?**

ही सगळी, म्हटले तर हास्यास्पद म्हटले तर करून म्हटले तर दारुण कथा मी सांगू लागलो म्हणजे ऐकणारांना अधिकाधिकच अद्‌भूत वाटत जाते. आणि तेच मला उलटा प्रश्न विचारतात, ''पण सरकार असे का करत असावे? तुमचे काय मत आहे?'' आता हा प्रश्न लोकांनी पी. व्ही. नरसिंहराव यांना विचारायला पाहिजे. मन मोहन सिंगांना विचारायला पाहिजे, अन्न-खात्यातील अधिकारी मोठ्या तोऱ्याने आयातीचे समर्थन करीत आहेत त्यांना विचारायला पाहिजे. मी काय उत्तर देणार? तरी मी सांगतो, ''यात तीन कारणे असण्याची शक्यता आहे.''

**बोफोर्स?**

पहिले म्हणजे, सध्या बोफोर्स बंद पडले असल्यामुळे खरेदीवर कमिशन मिळविण्याचा बिनधास्त मार्ग हाच राहिला असावा. धान्यांच्या या खरेदीवर टक्केवारी घेण्याची फार जुनी परंपरा आहे. ती बंद झाली असेल असे मानायला काही कारण नाही. अन्नखात्याच्या अधिकाऱ्यांनी हा सगळा व्यवहार केला. कापसाच्या निर्यातीचा निर्णय घेण्याकरिता सहासहा महिने लावणारे हे नोकरशहा आयात करायची म्हणजे १५ दिवसांत कॅनडा, अमेरिका, ऑस्ट्रेलिया येथे भेटी देऊन, खरेदी करून, बोटी ठरवूनसुद्धा मोकळे होतात. ही तत्परता नोकरशाहीत काही सुटत असल्याखेरीज शक्य नाही. गव्हाच्या आयातीत पैसे खाल्ल्याचा आरोप राजधानीत उघड उघड केला जात आहे. या आरोपाला अन्नखात्याच्या अधिकाऱ्यांनी दिलेला जबाब मोठा विनोदी आहे. ''गव्हाच्या आयातीत 'बोफोर्स' झाले का?'' अधिकाऱ्यांचे उत्तर असे की, ''या खरेदीत मध्यस्थ कोणी नव्हताच त्यामुळे मध्यस्ताच्या कमिशनचा प्रश्न उद्‌भवत नाही. गहू आणि शेतकरी असल्या विषयांत पत्रकारांनाही फारसे स्वारस्य नाही. साठ कोटींचे बोफोर्स गाजले पण तितक्याच रकमेचे गहू प्रकरण वर येण्याची काही शक्यता नाही.

**लढाईची शिबंदी?**

या अमंगल आयातीचे दुसरे काय समर्थन असू शकते? सरकार नजिकच्या भविष्यकाळात मोठी लढाई वगैरे सुरू करणार असेल तर धान्याचा मोठा साठा करून ठेवणे उचित होईल. पण अयोध्येच्या बैराग्यांना घाबरणारे सरकार असे काही धाडस करीत असेल हेही संभव नाही.

**अतिरेकी?**

राहाता राहिली एकच शक्यता. पंजाबमध्ये जगणे कठीण झाल्यामुळे तेथून निसटलेले काही अतिरेकी आता मंत्रालयात घुसले असावेत! आणि तेथून पंजाब पुन्हा एकदा भडकून उठावा अशा हेतून ते मुद्दाम पंजाबला घातक ठरणारे निर्णय जाहीर करवीत असावेत!

**लंगडे समर्थन**

सरकारचे डोके कसे चालले आहे हे समजणे खरंच कठीण आहे. या प्रश्नावर पूर्वीच्या काळीही शेतकीमंत्र्यांनी मोठी विदूषकी उत्तरे दिली आहेत. अमेरिकेतील शेतकऱ्याला जास्त भाव का, असा प्रश्न लोकसभेत आला असता राव विरेंद्रसिंगानी उत्तर दिले, ''अमेरिकेत आम्ही नेहमीनेहमी थोडीच खरेदी करतो? तेव्हा एखाद्या वर्षी खरेदी करावी लागली तर तेवढ्यापुरते जास्त भाव देणे योग्यच आहे.'' या उत्तरात सगळाच विदूषकीपणा नाही, काही खोल अर्थ आहे. अन्नसचिवांनी हाच मुद्दा मांडला आहे, पण नोकरशहाच्या शहाजोगपणाने मांडला आहे. ते म्हणाले, ''मागणी आणि पुरवठा यांच्यातील दरी भरून काढण्याकरिता आयात करणे अपरिहार्य होते.'' तजेन्द्र खन्ना खरे बोलत असतील तर मग आयातीचा निर्णय जाहीर करतांना पंतप्रधानांनी देशात अन्नधान्याच्या

तुटवडा आहे असे स्पष्ट का म्हटले नाही? सरकारी खरेदीत पाहिजे तितका गहू मिळाला नाही असे पंतप्रधान म्हणाले. शेतकऱ्यांनी २८ लाख टन गहू कमी विकला म्हणून ३० लाख टनाची आयात करावी लागत आहे असे पंतप्रधान म्हणाले. याचा अर्थ असा की मागणी पुरवठ्यातील तफावत देशात नाही, सरकारी वितरण व्यवस्थेत आहे. वितरण व्यवस्थेकरिता आवश्यक तो गहू शेतकऱ्यांनी दिला नाही कारण बाजारात साडेतीनशे रुपयांचा भाव चालू असतांना शासनाने बळेच दोनशे ऐंशी रुपयांचा आपला सरकारी भाव टिकविण्याचा हेका धरला. बाजारात व्यापारी, अडते यांना उतरण्याचा मज्ज्ञाव केला. पंजाबातील भारती किसान यूनियनच्या दोन्ही संघटनांनी या प्रकाराचा विरोध केला होता.

या खेरीज शेतकऱ्यांनी गहू बाजारात न आणण्याचे आणखी एक कारण होते. एरवी, गव्हाचा हंगाम चालू झाल्यानंतर दोनच महिन्यात सगळ्या पंजबातील गहू बाजारात उतरतो. शेतकऱ्यांनी जाणीवपूर्वक थोडे थांबून बाजारात जाण्याचे ठरविले. त्यामुळे सरकारची मोठी घबराट उडाली साडेतीनशे रुपये भावाने देशात गहू खरीदण्याऐवजी परकीय चलनात साडेपाचशे रुपये खर्चून गहू आयात करण्याचे सरकारने ठरविले हे योग्य झाले किंवा नाही?

दोनशे ऐंशी रुपयांमध्ये पुरेसा गहू मिळाला असला तर सरकारने आयातीचा विचार केला नसता, हे नक्की. याचाच अर्थ कमी पडणाऱ्या गव्हाची भरती दोनशेऐंशी पेक्षा अधिक भावाने सरकारने केली असती तरी आयात करण्याची पाळी आली नसती. मग सरकारने असे का नाही केले? आयातीचा महागडा 'अव्यापारेषु व्यापार' का पत्करला?

**प्रतिष्ठेचा प्रश्न का शेतकरी द्वेष?**

याचे एक उत्तर स्पष्ट आहे. खरेदी भावाने निम्मी अधिक भरती झाल्यानंतर सरकारने भावात फरक केला असता तर पुढील वर्षी भावात वाढ होईल या आशेने शेतकऱ्यांनी माल आणखी काही काळ राखून ठेवला असता. सरकारी खरेदीची शान राखायची असेल तर एकच उपाय! कोणत्याही परिस्थितीत एकदा ठरलेला भाव शासन बदलत नाही, आवश्यक पडले तर हजारो कोटी रुपयांचा तोटा सरकार सहन करेल पण शेतकऱ्यांपुढे मान तुकविणार नाही! थोडक्यात, गव्हाची आयात ही शेतकऱ्यांना दिलेली शिक्षा आहे. शासनाचे शेतकरीद्वेषाचे धोरण ज्यांनी पाहिले आहे त्यांना यात आश्चर्य वाटणार नाही.

पण आपल्या शेतकरीद्वेषाची जाहीर कबुली सरकार थोडेच देणार आहे? आपल्या कृतीचे काही तरी थातुरमातुर समर्थन देण्याची त्यांची धडपड चालू आहे. जास्त किंमत देऊन सरकारने गहू मिळविला असता तर त्यामुळे खुल्या बाजारपेठेतील पुरवठा कमी पडला असता आणि त्यामुळे खुल्या बाजारपेठेत किंमती भडकल्या असत्या असे त्यांचे अर्थशास्त्रीय पांडित्य आहे! आता हा युक्तिवाद किती फसवा आहे, पाहा.

दोनशे ऐंशी रुपयात सरकारला पाहिजे तितकी म्हणजे एक कोटी टन गव्हाची खरेदी झाली असती तर सरकार खूष झाले असते. मग आयातीचा विषयही निघाला नसता. त्या परिस्थितीतही खुल्या बाजारपेठेतील पुरवठा कमी पडलाच असता. तेव्हा हा युक्तिवाद उघडपणे लंगडा आहे. खोटे बोलायचे असले म्हणजे जाडेजाडे शब्द वापरण्याची प्रवृत्ती होते. सेक्रेटरीसारख्या उच्चपदस्थ अधिकाऱ्याने यामुळेच मोठा विचित्र इंग्रजी प्रयोग केला असावा. सरकारने भाव वाढवून देशात जरूर ती भरती केली असती तर खाजगी व्यापाऱ्यांच्या हातून गहू फक्त सरकारच्या हाती आला असता - without any net additionality in domestic availability.

**ग्राहकांकडून समर्थन**

आयातीच्या समर्थनार्थ आणखी एक युक्तिवाद केला जातो. शेतकऱ्यांचे हितसंबंध जपले पाहिजेत हे तर खरे, पण त्याबरोबर ग्राहकांचेही संरक्षण झाले पाहिजे? ग्राहकाच्या पदाराआड लपून भांडवलदारांचे हितसंवर्धन करण्याचा हा पवित्रा फार जुना आहे. पण ग्राहकांचे हित कशात आहे? गेली पाच वर्षे गव्हाचे उत्पादन साडेपाच कोटी टनाच्या आसपास स्थिरावले आहे. ते फारसे वाढत नाही याची चिंता सरकारला लागली आहे. उत्पादन असे थंडावले तर ग्राहकांची शिधापुरवठ्याची व्यवस्था करण्याकरिता आयात करणे भागच आहे असा त्यांचा युक्तीवाद आहे.

**पुन्हा आयातीच्या दुष्टचक्राकडे**

थोडक्यात, देशातले गव्हाचे उत्पादन स्थिरावू लागले तर असे का होते याचा विचार करायचा नाही, शेतीतील भांडवल गुंतवणूक का कमी पडते आहे. याचा अभ्यास करायचा नाही; गव्हाऐवजी शेतकरी दुसऱ्या पिकांकडे का वळत आहेत ते नजरेआड करायचे आणि परदेशातून आयात करायला सुरुवात करायची.

यामुळे शेवटी काय होईल? लाल बहाद्दूर शास्त्री पंतप्रधान झाले त्यावेळी जी परिस्थिती होती तशीच स्थिती पुन्हा एकदा तयार होईल. गहू परवडत नाही म्हणून शेतकरी पिकवीत नाही आणि गहू पिकत नाही म्हणून सरकार आयात करते हे दुष्टचक्र पुन्हा एकदा सुरू होईल. यामुळे, उत्पादन वाढणार नाही, आयातीचा रतीब चालू होईल, सोय फक्त टक्केवारीने कमिशन खाणाऱ्यांची होईल.

**वेगवेगळ्या किंमतींचा गोलमाल**

या, दोनशे ऐंशी रुपये भावाची एवढी काय प्रतिष्ठा आहे की, जिच्या करता सरकारने आपली सारी इभ्रत पणाला लावावी? धान्याच्या पिकांना एका काळी लेव्हीची किंमत असे. ६५ साली कृषि मूल्य आयोग स्थापन झाल्यानंतर धान्यपिकांकरिता खरेदीच्या किंमती आणि इतर नगदी पिकांकरिता आधारभूत किंमत अशी दुहेरी व्यवस्था चालू झाली. आधारभूत किंमत म्हणजे कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्याला मिळाली पाहिजे अशी किमान किंमत. खरेदीकिंमत ही अगदी वेगळी कल्पना आहे. सरकारला ज्या शेतीमालाची खरेदी करायची आहे त्या व्यवहारातील ही किंमत आहे. खरेदीकिंमत आधारभूत किंमतीपेक्षा नेहमीच वरचढ असली पाहिजे.

खरे म्हटले तर ही दुहेरी व्यवस्था निरर्थक आहे. खरेदी किंमत अशी काही गोष्ट असताच कामा नये. खुल्या अर्थव्यवस्थेत सरकारने बाजारपेठेत उतरून चालू भावाने खरेदी केली पाहिजे. एखादे वर्षी शेतकऱ्यांना चांगला भाव मिळेल, एखादे वर्षी कमी मिळेल. या पलिकडे जाऊन आधारभूत किंमत मिळण्याची व्यवस्था हवी असेल तर शेतकऱ्यांना तसा विमा उतरवता येईल. किंमती पडल्यावर सरकारने आधारभूत किंमत देण्याकरिता बाजारात उतरावे अशी शेतकऱ्याची अपेक्षा असेल तर सरकारी खरेदीची किंमत खुल्या बाजारातील किंमतीपेक्षा कमी असणार हे उघड आहे. थोडक्यात, खरेदीची किंमत आधारभूत किंमतीपेक्षा जास्त, पण खुल्या बाजारपेठेतील किंमतीपेक्षा काहीशी कमी असावयास पाहिजे.

**सरकारी हातचलाखी**

हे सगळे विवरण मोठे गोंधळाचे आहे. आणि सरकारने याच गोंधळाचा फायदा घेऊन शेतकऱ्यांना साफ नाडले आहे. होळी, शिमगा, फाल्गुन असे म्हणून तीन महिन्यांचे व्याज लावणाऱ्या सावकारांसारखी हातचलाखी सरकारने केली आहे. लेव्हीची किंमत ६५ सालापर्यंत ठरवली जात होती. खुल्या बाजारपेठेच्या तुलनेने लेव्हीची किंमत ५० ते ६० टक्क्यांच्या आसपास असे. १९६५ साली कृषि मूल्य आयोग स्थापन झाला आणि आधारभूत किंमती जाहीर होऊ लागल्या. तीन वर्षांनी सरकारी खरेदीकरिता आधारभूत किंमतीऐवजी खरेदीकिंमत अंमलात आणावी असे ठरले आणि इथे सरकारने हातचलाखी केली. आधारभूत किंमतीतच जुजबी वाढ करून तिलाच खरेदी किंमत म्हणून घोषित करण्यात आले. खरेदी किंमत आधारभूत किंमतीपेक्षा निदान २० टक्के जास्त पाहिजे असे धरले तर गेली २५ वर्षे सरकार खरेदीकिंमत सांगून, पण आधारभूत किंमत लावून गव्हाची खरेदी करीत आहे. गहू, ज्वारी इत्यादी धान्यांची खरेदी किंमत आणि कापूस, भुईमूग इत्यादी नगदी पिकांना द्यायची आधारभूत किंमत या दोन्हीही किंमती काढण्याची पद्धत एकच आहे. खरेदी किंमतीच्या हिशोबात थोडे उजवे किंवा झुकते माप दिले जात नाही, देण्याची व्यवस्थाही नाही. म्हणजे, खरेदीकिंमत, काही झाले तरी, बदलणार नाही अशी जी शासनाने आपली प्रतिष्ठा पणाला लावली आहे त्यात काही अर्थ नाही. ही खरेदीकिंमत मुळातच फसवाफसवीची बाब आहे. त्याचा एवढा बाऊ करून सरकारने शेतकऱ्यांना धडा शिकविण्याचे धाडस करायला नको होते.

**पंचाक्षऱ्यापेक्षा जहाल मात्रा**

यावर आता शेतकरी काय उत्तर देणार? आयातीला विरोध तर करणारच. नेहरूनीतीचे भूत पुन्हा एकदा उठू पाहात आहे, त्यावर पंचाक्षऱ्याची मात्रा चालवणारच. पण, याला खरे चोख उत्तर गहू उत्पादक शेतकरीच देऊ शकतील. परदेशातून धान्यधुन्य आणणे इतके सहज आणि सोपे असेल तर सरकारने यापुढे सगळे अन्नधान्य विलायतेतूनच आणवावे. आम्ही आमच्या पोटाच्या गरजे इतकेच धान्य पिकवू असा निर्धार शेतकऱ्यांनी केला तर सरकारची मस्ती उतरल्याखेरीज राहाणार नाही.

■ ■ ■

# कुठे गेला विलायती गहू?

# बिहारमध्ये भुकेने ५० जण मेले

गरीबांना पुरेसा धान्यपुरवठा व्हावा यासाठी शासनाने परदेशात खरेदी केलेला गहू देशाच्या बंदरांतून देशात येऊ लागला असतानाच बिहारमधील गिरीडीह जिल्ह्याच्या मनियाडीह व मेदनीसोर गावांतील लोकांवर गवत व झाडांचा पाला उकडून खाण्याची पाळी आली आहे. जिल्ह्याच्या गांडी प्रभागाचे अधिकारी श्री विश्वेश्वर पाठक यांनी दिलेल्या माहितीनुसार मनियाडीह, द्वारपट्टी, मेदनीसोर या गावांत व आसपासच्या भागात आजपर्यंत ५० हून अधिक माणसे भुकेमुळे मरण पावली.

हस्त नक्षत्रातील पावसाने दगा दिल्यामुळे सर्व शेते उजाड झाली आणि लोकांना भूक मिळविणे अशक्य झाले. या परिसरातील ही परिस्थिती इतकी भयानक आहे की मनीयाडीह गावातील मेंकू मंझाइन या बाईचा पती भुकेने मरण पावला तर ती बाई म्हणते, ''त्यांना मृत्यू म्हणजे वरदानच लाभले. मी आणि माझी मुले आज (गवत, कडबा खाऊन) ज्या यातना भोगतो आहोत त्यातूनतरी त्यांची सुटका झाली.'' (दै. आज का आनंद ११-११-९२ वरून)

देशाच्या एका भागात, एरवी गुरांनाच खाऊ घातले जातात अशा पदार्थांवर जीव तगविण्याची लोकांवर पाळी आलेली असतांना प्रश्न उभा राहातो की अमूल्य परकी चलन खर्च करून, देशातल्या शेतकऱ्याला दिल्या जाणाऱ्या भावाच्या दुप्पट भावाने विकत आणलेला गहू कोणासाठी आणला? का आणणाऱ्यांना त्याच्या फक्त खरेदी व्यवहारापुरतेच स्वारस्य होते?

■ ■ ■

## अन्नधान्याचे उत्पादन वाढले आहे

१९९२-९३ या आर्थिक वर्षांत भारताच्या शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतीमालाने (ऊस व ताग वगळता) उच्चांक स्थापित केलेला असेल असा होरा आहे. हवामान व पीकपरिस्थिती यावरून तज्ज्ञांनी वर्तविलेले शेतीउत्पादनाचे अंदाज पुढीलप्रमाणे आहेत.

| **हंगाम** | **पीक** | **उत्पादन (दखलक्ष टन)** | | **शेकडा वाढ.** |
|---|---|---|---|---|
| | | **१९९१-९२** | **१९९२-९३** | |
| खरीप | भात | ६६.१ | ६७.५ | २.१ |
| | भरड धान्ये | २३.० | २६.५ | १५.२ |
| | कडधान्ये | ४.५ | ५.५ | २२.२ |
| | **एकूण (इतर धान्यांसह)** | **५३.६** | **१००.०** | **६.८** |
| रबी | गहू | ५५.२ | ५७.० | ३.३ |
| | इतर धान्ये | २०.४ | २०.० | -२.० |
| | **एकूण** | **७५.६** | **७७.०** | **१.९** |
| **वार्षिक** | **एकूण (धान्ये)** | **१७१.०** | **१७७.०** | **३.५** |
| | तेलबिया | १८.९ | २०.० | ५.८ |
| | कापूस | ११.९ | १३.० | ९.३ |
| | ताग | ७.५ | ७.४ | - ३.८ |
| | ऊस | २५०.८ | २५०.० | - ०.३ |

इकॉनॉमिक टाईम्स २६/१०/९२ वरून.

## शेतकऱ्यां-विरुद्धच्या लढाईत इंडिया शासन आणखी हत्यारे बाहेर काढणार

नेहरूनीतीने चालणारे शासन सध्या परदेशी गव्हाच्या तलवारीने शेतकऱ्यांना घायाळ करीत आहे.

लवकरच, शासन अमेरिकेतील शेतकऱ्यांनी त्यांच्याकडील डुकरांना खाऊ घालण्यासाठी तयार केलेली ज्वारी आयात करण्याचा विचार करीत आहे, असे समजते.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या अन्न व शेती संघटनेच्या अंदाजानुसार इंडिया शासन सध्याच्या गव्हाच्या आयातीखेरीज येत्या वर्षी सुमारे २५ लाख टन तांदूळाचीही आयात करण्याची शक्यता आहे.

# शेतीला दिलासा

शेतीला उद्योगाचा दर्जा देण्याचा केंद्र सरकारचा निर्धार धोरणाविषयक निवेदनात स्पष्ट झाला असला तरी ते शेतकऱ्यांचे सर्वस्वी भले करायला निघाले आहे, अशा भ्रमात कोणीही राहण्याचे कारण नाही. उलट, आयातीच्या प्रश्नावर सरकार शेतकऱ्यांना धडा शिकवू पाहत आहे की काय, अशीच शंका येते. वस्तुतः शेतीच्या कोणत्याच प्रश्नाचा सुटा विचार करून परवडणारे नाही, याचे भान सरकारने केवळ कागदोपत्री ठेवून चालायचे नाही. सध्या एकूणच सामाजिक वातावरण थंड असल्याने शेतकऱ्यांचे प्रश्नाविषयी सर्वच विरोधी पक्षांना प्रेमाचे भरते आले आहे. भाजप, जनता दल, समाजवादी जनता पक्ष आदींनी त्यांच्या प्रश्नासाठी आंदोलन करण्याच्या घोषणा केल्या होत्या. त्यापाठोपाठ पंतप्रधान नरसिंह राव यांनी या वर्गाला खूष करण्याचा चंग बांधला. छोट्या व अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी पाचशे कोटींची योजना, सर्वंकष पीक वीमा योजना या घोषणा याच राजकारणाचा परिपाक म्हणता येतील. त्यापाठोपाठ सरकाने गेल्या गुरुवारी शेतीविषयक धोरणही जाहीर केले. कृषिविषयक धोरणांबाबत गेली दोन अडीच वर्षे जी अनिश्चितता होती ती काहीशी दूर व्हायला काही हरकत नाही. यापूर्वी या धोरणाचा एकत्रित स्वरूपात विचार झालेला नव्हता. राष्ट्रीय आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यावर १९८९ मध्ये या प्रयत्नांना प्रारंभ झाला. त्याला आता काहीसे मूर्त स्वरूप येऊ पाहत आहे. शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशीही यासंबंधात अधिक आग्रही होते. व्ही. पी. सिंग यांच्या पंतप्रधानपदाच्या राजवटीत जी कृषिविषयक उच्चाधिकार समिती नेमण्यात आली, तिचे अध्यक्षपद श्री. जोशी यांच्याकडे होते. शेतीविषयक धोरण हा राष्ट्रीय धोरणातील छोटा अंश न मानता तो मध्यवर्ती व महत्त्वाचा भाग मानावा, हा त्यांचा आग्रह आहे. हे धोरण एकदा सुनिश्चित झाले की, इतर सर्व क्षेत्रातील धोरणे आपोआप ठरतात, असे त्यांचे प्रतिपादन आहे. त्यांच्या अहवालातील काही शिफरशींचा नव्या धोरणात विचार झालेला दिसतो.

**भांडवलसंचयाचा प्रश्न**

शेतीत अधिक प्रमाणात भांडवलसंचय व्हावा व सुलभपणे कर्ज मिळावे यावर नव्या धोरणात विशेष भर आहे, ते स्वागतार्ह मानावे लागेल. शेतकऱ्यांचे शोषण थांबले तरच हे शक्य होणार आहे. शेतीत तयार होणाऱ्या बचतीवर भांडवलनिर्मिती अवलंबून असते. पण ही बचत शेतकऱ्यांकडून ओरबाडून नेण्याची पद्धत देशाला घातक ठरली आहे. ही बचत शेतीतच राहिली असती तर शेतीतील उत्पादन, गुंतवणूक, शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारले असते. भांडवलसंचय वाढावा, ही भूमिका म्हणूनच महत्त्वाची वाटते. शेती हा उद्योग मानल्याने अशी उद्दिष्टे साध्य होण्यास मदतच होणार आहे. आपल्या शेतकऱ्यांचे राहणीमान उंचावणे, त्यातून अंतर्गत बाजारपेठ संपन्न होणे, इतर सर्वच उद्योगधंद्याना त्यातून वाव मिळणे यासाठी प्रयत्न व्हावेत, अशी अनेक शेतीतज्ज्ञांची इच्छा होती. शेतीला उद्योगाचा दर्जा मिळाल्याने ती फलद्रूप व्हायला वाव मिळाला आहे. उद्योगपती डॉ. निलकंठ कल्याणी यांनी मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष या नात्याने या दिशेने जे काही उपक्रम राबविले, त्यांचा सार्वत्रिक पातळीवर आता विचार व्हायला हवा. त्यांनी मराठा चेंबरमध्ये स्वतंत्र कृषि विभाग उघडून एक नवा उपक्रम प्रत्यक्षात आणला. शेतकरीवर्गाला त्यांनी सभासद होण्याचे आवाहन केले. त्यातून अनेक परदेशी संघटनांनी व शेतीशी संबंधित व्यक्तींनी यात रस दाखवून संपर्क साधला आहे.

**उद्योजकाची दृष्टी**

शेतकऱ्यांना आता उद्योजकाची दृष्टी बाळगली पाहिजे, हे आवर्जून सांगायला हवे. तंत्रज्ञानाच्या आघाडीवर प्रयत्न झाले तर उत्पादनाचे प्रमाण व दर्जा वाढवणे अवघड वाटणार नाही. शेतीला उद्योगाचा दर्जा देण्याबाबतची निःसंदिग्ध व्याख्या करणेही महत्त्वाचे आहे. पण नव्या धोरणात ती तितकीशी स्पष्ट नाही. कारखानदारीला जे कायदे लागू होतात ते पूर्णतः शेतीला लागू करणे अर्थात शक्यच नाही. त्यामुळे शेतीत भांडवली नफा झाला तर त्यावर कर न लावणे हे योग्यच म्हटले पाहिजे. शेतकरी प्राप्तिकर भरू शकतील, तो सुदिन आला पाहिजे, असे शेतकरी संघटनेला वाटते. पण त्यासाठी या क्षेत्राला प्रथम भक्कम आधार द्यावा लागेल. हा आधार उद्योगाचा दर्जा देऊन द्यायचा की काही मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्यायचा, हा प्रश्न म्हणूनच एका अर्थाने गौण ठरतो. गेल्या चाळीस वर्षात कारखानदारीला झुकते माप दिले व शेतीला सापत्नभावाने वागवले, असे म्हणणारा जो एक वर्ग आहे, त्याची भावना लक्षात घ्यायला हवी. सरकार उद्योग व शेती या दोन्ही क्षेत्रांतील व्यवस्थेत व विकासात परिवर्तन चलनाच्या संकटातून सोडवायला विशेष साहाय्यभूत ठरणार आहे. तिला उद्योगाचा दर्जा देण्याचा विचार या संदर्भातच झाला असला पाहिजे. केंद्र सरकारने एकीकडे मुक्त अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला असला तरी शेतीला उद्योग व्यापारधोरणाच्या प्रत्यक्ष लाभापासून वंचित ठेवलेले आहे. निर्यातीच्या धोरणाबाबतही पक्षपाती वृत्ती दाखवली आहे. शेतमालनिर्यातीच्या प्रयत्नांचे पाय कापण्याच्या धोरणांना आता काही काळ तरी लांबणीवर टाकावे लागेल. या प्रयत्नाबरोबर शेतीमालावर आधारित उद्योगांना चालना देण्यासाठी पावले टाकणे, सहकारी संस्थांवरील सरकारचे नियंत्रण कमी करणे, हे धोरणही केवळ कागदावर राहून चालायचे नाही.

**लंगडे समर्थन**

या सर्व पार्श्वभूमीवर सरकारचे गहूआयातीचे धोरण वादग्रस्त ठरत असेल, तर त्याचा दोष सरकारला द्यायला हवा. माजी पंतप्रधान व जनता दलाचे नेते विश्वनाथप्रताप सिंग यांना हा प्रश्न सरकारला झोडपण्याचे साधन म्हणून आयताच मिळाला. आयात गहू घेऊन येणाऱ्या बोटीतील माल रोखण्यासाठी न्हावाशेवा बंदर नाकेबंदीचे आंदोलन येत्या दोन दिवसात सुरू होईल,

## लोकसत्तेतील संपादकीय, दि. १७/११/९२

असा रागरंग दिसतो. श्री. शरद जोशी यांनी ते प्रथम घोषित केले पण ते आता सिंग यांनी 'हायजॅक' केले आहे, असेच म्हटले पाहिजे. श्री. सिंग हे शेतकऱ्यांचे खरेखुरे कैवारी नाहीत. बिहारसारख्या राज्यात जनता दलाचे राज्य असतानाच त्यांच्या पक्षाने तेथे त्यांच्यासाठी काहीही केलेले नाही. शेतकऱ्यांच्या या प्रश्नाच्या निमित्ताने त्यांना विजनवासातून बाहेर येण्याची संधी मिळाली आहे, इतकेच. गहूआयातीच्या प्रश्नावर सरकारची समर्थने लंगडी होत चालल्याने आंदोलकांचा जोर वाढणेही अपरिहार्य आहे. देशात भरपूर गहू उपलब्ध असताना चार हजार कोटी रुपयांचे परकीय चलन व्यर्थ खर्च करण्याचा खटाटोप कमिशनसाठी तर नव्हे ना, असा संशय म्हणूनच बळावत राहतो. बाजारपेठेत प्रतिक्विंटल ३५० रुपये भाव असताना सरकारने २८० रुपये भाव देऊ केल्यानेच त्यांना खुल्या बाजारात पुरेसा गहू खरेदी करता आलेला नाही. आता त्यापेक्षा कमी प्रतीचा गहू ५५० रुपये भाव देऊन आपण आयात करीत असल्याने शेतकऱ्यांना धडा शिकवण्यासाठी हे सर्व चालले आहे, असा आरोप केला तर चुकले काय? या धोरणामुळे पुढील वर्षापासून देशातील गव्हाचे उत्पादन घटण्याचा धोका मात्र निश्चित आहे. पंजाब, हरयाणा ही प्रामुख्याने गहू उत्पादनाची प्रमुख राज्ये असल्याने तेथील शेतकऱ्यांना या प्रश्नाची झळ अधिक लागली आहे. पंजाबातील परिस्थिती थोडीफार सुधारत असताना तेथील शेतकऱ्यांनी संतप्त व्हावे, असे हे पाऊल ठरले आहे. शेतकऱ्याला उत्पादनखर्चावर आधारित भाव मिळायला हवेत, हा विचार नव्या धोरणातही महत्त्वाचा मानावा, अशी अपेक्षा असताना सरकारची ही कृती मात्र नेमकी त्याच्या विरुद्ध जाणारी आहे. सरकारने खुल्या बाजारपेठेत ढवळाढवळ केली नाही, तसेच निर्यातीवर बंदी आणली नाही, तर शेतकऱ्याला आपोआप उत्पादनखर्चावर भाव मिळू शकतील. आयात-निर्यात खुल्या व्यापाराने व्हायला वस्तुतः कोणाची हरकत नसावी, पण सरकारची ही गहूआयात मात्र शेतकऱ्यांचे कंबरडे मोडण्याच्या हेतूने होत असल्याने निषेधार्ह आहे. त्याद्वारे महागाई कमी करण्याचा सरकारचा दावा, तर हास्यास्पद आहे. सरकारी उधळमाधळ, तुटीची अर्थव्यवस्था, चुकीची आर्थिक धोरणे यामुळे महागाई झाली, हे कसे विसरता येईल? सरकारने असेच धोरण चालू ठेवले तर शेतीसाठी कागदोपत्री कितीही धोरणात्मक लंब्याचौड्या गप्पा मारल्या तरी त्या निरर्थक ठरतील.

■ ■ ■

# पुणे जिल्ह्यात नेहरूनीतीचे दहन

पुणे जिल्ह्यात मरकळ, भोसे, फुलगाव, लोणीकंद इत्यादी गावी दि. १४ नोव्हेंबर १९९२ रोजी नेहरूनीती पुतळ्याचे दहन करण्यात आले. शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी नेहरूनीतीने शेतकऱ्यांची व देशाची कशी दुर्दशा केली याचे विश्लेषण करून या कार्यक्रमाची भूमिका जमलेल्या गावकऱ्यांना समजावून दिली.

**दि. १४ नोव्हेंबर १९९२ रोजी सकाळी ९-३० वाजता मरकळ येथे पुणे जिल्हा प्रमुख श्री. नंदकुमार लोखंडे यांच्या उपस्थितीत नेहरूनीतीच्या पुतळ्याचे दहन करण्यात आले. तरुण कार्यकर्ता संजय चव्हाण नेहरू नीतीच्या पुतळ्यास डाग देताना.**

# परदेशी कर्जाचा वाढता बोजा

***आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून लवकरच आपण २५० ते ३०० कोटी डॉलरचा आणखी एक हप्ता घेणार आहोत. आज देशावर ७५०० कोटी डॉलरचा बोजा आहे. तो दहा हजार कोटी डॉलरपर्यंत वाढेलही हा बोजा कमी होण्याऐवजी वाढेल की काय, अशी भीती आता निर्माण झाली आहे.***

नवव्या वित्तआयोगाचे अध्यक्ष या नात्याने अलीकडे श्री. कृष्णचंद्र पंत यांनी देश हा परेदशी कर्जसापळ्यात अडकण्याच्या शक्यतेबाबत इशारा देऊन देशाच्या अर्थकारणाबाबत तज्ज्ञांनी पुन्हा एकदा नीट विचार करावा, असे म्हटले होते. वित्तआयोगाचे अध्यक्ष असे कधी बोलत नसतात; पण कदाचित श्री. पंत यांना गप्प बसणे अनुचित वाटले असेल. असो, हे विचार खरे तर अनेकांच्या मनातील विचार आहेत हे नक्की. रिझर्व्ह बँकेचे माजी गर्व्हनर आय. जी. पटेल यांनीही वाढत्या परदेशी कर्जाबाबत स्पष्ट चिंता प्रकट करून नाणेनिधीकडून धडाधड कर्जे काढण्याची योजनाही ठीक नाही व परदेशी गुंतवणूक होतानाही काही पथ्ये पाळावी, हेही निदर्शनास आणले आहे.

परदेशी कर्ज आणि ठेवी घेताना मोठ्या प्रमाणात परदेशी चलन हाती लागते. यामुळे देशाची चलनगंगाजळी फुगते व सढळ आयात सुरू होते. बऱ्याच वेळा हे कर्ज मुद्दल आणि व्याज या दोन्हींच्या परतफेडीच्या कबुलीने घेतल्याचाही विसर पडतो. परदेशी स्थायिक झालेल्या भारतीयांकडून येणाऱ्या ठेवीही एका प्रकारे कर्जसदृश्यच असतात. वाढत्या कर्जाने व्याजभार वाढतो आणि हे व्याज कर्जाची परतफेड यातच नव्या कर्जाचा बराचसा भाग खर्ची पडत राहतो.

सभोवती वैयक्तिक वा व्यापारासाठी एरवी काढली जाणारी कर्जे आणि देशाने काढलेली कर्जे यात याबाबत समानता आहे. यात एकच फरक असा, की अधिक भाववाढीने वैयक्तिक कर्जे वा व्यापारी कर्जे जसा फायदा देतात त्याप्रमाणे देशाच्या कर्जाबाबत होत नाही.

निर्यातीने प्रत्यक्ष मालाची व सेवांची आणि पर्यटन, जहाज व विमानवाहतूक इत्यादी सेवांद्वारा मिळणारे परदेशी चलन, हेच अशी कर्जे व व्याज परत देण्यासाठी उपयोगी पडतात. भारताची आयात अधिक अन् निर्यात कमी यांमुळे कर्जफेडीस कोठून चलन मिळणार, मग नव्या कर्जाने ही गरज भागविली जाते. या चक्रव्यूहातून बाहेर पडणे कठीण असते. असाच कर्जाचा डोंगर उभा राहतो.

१९९० - ९१ मध्ये परदेशी कर्जाचे निर्यातीशी प्रमाण २५९ टक्के होते ते १९९१ - ९२ मध्ये ३०३ टक्क्यांपर्यंत वाढले. आज आपली कर्जपरतफेड (हप्ता) व देय व्याज यांचे निर्यातीशी प्रमाण २६.५ टक्के आहे, असे खुद्द रिझर्व्ह बँकेचे म्हणणे आहे.

परदेशी चलनांतील मुद्दल परतफेड व व्याज येत्या चार वर्षांत किती असेल याचा अंदाज पहा.

| | |
|---|---|
| ९०-९१ | १०६३ कोटी डॉलर |
| ९२-९३ | ९८६ कोटी डॉलर |
| ९३-९४ | ८९५ कोटी डॉलर |
| ९४-९५ | ८५१ कोटी डॉलर |

हा हिशोब सध्याचे कर्ज धरून केलेला आहे. यात भर पडणारच आहे.

अर्थमंत्र्यांनी आपल्याला सध्याचे मुक्त धोरण पुढे रेटायचे असेल, तर ९०० कोटी डॉलर लागतील, असे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीस स्पष्ट केले आहे. वित्तखात्याचे सचिव मान्टेकसिंग अहलुवालिया यांनीही येत्या तीन वर्षांत प्रत्येकी २०० ते २५० कोटी डॉलरचे कर्ज लागेल, असे नाणेनिधीच्या एका बैठकीत म्हटले होते.

**कर्जाचे वाढते प्रमाण**

नाणेनिधी व तत्सम जागतिक वित्तसंस्था विविध प्रकारे कर्जे देतात. देशाचे आर्थिक धोरण धनको देशांच्या मनासारखे असेल, तर दीर्घ मुदतीची (१५-१८ वर्षे) अत्यल्प दरांची (०.५ ते ४) कर्जे प्राप्त होतात वा व्यापारी दराने अल्पमुदतीची फारशा अटी नसलेली कर्जे मिळतात. अर्थातच, परतफेडीचा काळ व वर्षानिहाय पडणारा बोजा लक्षात घेऊनच सरकारला कसे कर्ज घ्यायचे, हे ठरवावे लागते. देशांतर्गत राजकीय स्थिती व विचारधारांचा दबावही विचारांत घ्यावाच लागतो.

वरील कर्जपरतफेड व व्याजापायी येत्या चार वर्षांत पडणारा बोजा पहिला आणि दरवर्षी २५० ते ३०० कोटी डॉलरची गरज लक्षात घेतली, तर दरवर्षी १००० ते ११०० कोटी डॉलरचे कर्ज आपल्याला लागणार आहे.

सरकारने अलीकडे भारतात परदेशी गुंतवणुकीस दारे खुली केली, याला हीच पार्श्वभूमी कारणीभूत आहे. कारण ज्या प्रमाणात यामार्गे चलन येईल, तेवढे कर्ज कमी लागेल. निर्यातीस देण्यात येणारे अधिकाधिक प्रोत्साहनही याचसाठी आहे.

परदेशी गुंतवणूक वर्षाला १०० कोटी रुपये आणेल हे भाकित फोल ठरले आहे. १९९१ - ९२ मध्ये २० कोटी डॉलर आले होते. ते वाढून यंदा ५० कोटी येतील व एक हजार कोटींची पातळी गाठण्यासाठी काही काळ लोटावा लागेल.

परदेशी कर्ज, मग ते कोणत्याही स्वरूपात असले तरी अनेक मार्गांनी बंधनांनी आपल्याला जखडते, यात शंका नाही. दर वेळी कर्ज घेताना हे कर्ज सध्याच्या परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी आहे, असे सांगितले जाते. पण प्रत्यक्षात असे होत नाही. आयात-निर्यातीतील तफावत वाढतच जाते आणि पुन्हा कर्ज काढण्याची पाळी येते. पण आपण पुन्हा तीच घोषणा ऐकतो - 'हे कर्ज' सद्यस्थितीतून बाहेर पडण्यासाठी आहे.' ''देश अब कठिनाईयोंसे घेरा हुआ है और हमे इससे बाहर आना है।'' हे आपण स्वातंत्र्यांनंतर सतत ऐकत आलो आहोत!

सरकारने स्वतःहून परदेशी कर्ज मर्यादित ठेवण्यास बंधने पाळायचे ठरविले आहे. ही स्तुत्य गोष्ट आहे. परंतु प्रत्यक्षात काय घडते ते पहावे लागेल कारण कागदोपत्री फेरफार कामाचे नाहीत.

जागतिक बँकेने भारताचे कोट्यासाठीचे स्थान आणखी खाली ढकलले आहे. परदेशी व्यापार, चलन गंगाजळी इत्यादी अनेक गोष्टींचा विचार करून ठरविण्यात येणारे हे स्थान १२ वरून १३ वर गेले आहे. यामुळे, आपला एसडीआर (स्पेशल ड्रॉईंग राईट्स) कोटा घटेल व मताधिकार घटेल. पूर्वी पहिल्या पाचात असलेले स्थान आता १३ वर गेले आहे.

**(सकाळ (पुणे), १७/११/९२ वरून साभार)**

■■■

# पंजाबमधील गहू क्षेत्र २५ टक्क्यांनी कमी करणार

वास्तविक गरज नसतांना आणि तीही दामदुपटीच्या भावाने केलेल्या गहूआयातीच्या निषेधार्थ पंजाबातील शेतकरी गव्हाखालील क्षेत्र २५ टक्क्यांनी कमी करतील अशी माहिती पंजाबच्या भारती किसान यूनियनचे अध्यक्ष सरदार भूपेंद्रसिंग मान यांनी आंबेठाण येथे दि. १२ नोव्हेंबर १९९२ रोजी पत्रकारांना दिली.

देशातील शेतकरी आंदोलनाच्या कार्यक्रमाची पुढील आखणी करण्याच्या दृष्टीने एक प्राथमिक बैठक घेण्यात आली होती त्यासाठी श्री. भूपेंद्रसिंग मान आंबेठाण येथे आले होते. त्यांच्याखेरीज हरियानाहून श्री. घांसीरामजी नैन, प्रेमसिंह दहिया, गुजरातमधून श्री. बिपिनभाई देसाई, भगुभाई पटेल, लाभशंकर उपाध्याय, आंध्रप्रदेशातून एस्. पी. शंकर रेड्डी, उत्तर प्रदेशातून अजय 'अनमोल', बुंदेलखंडहून डॉ. रामनाथन कृष्ण गांधी तसेच किसान समन्वय समितीचे अध्यक्ष विजय जावंधिया व शेतकरी संघटनेचे अध्यक्ष किशोर माथनकर आणि सर्व राज्यांतील सहकारी या बैठकीस आले होते. या बैठकीत उपस्थितांनी श्री. शरद जोशींबरोबर चर्चा करून नेहरूनीतीच्या आधाराने आजचे शासन, खुल्या अर्थव्यवस्थेचा उद्‌घोष करीत असले तरी शेतकऱ्यांची लूट करीत आहे, शेतकऱ्यांना आयातीसारख्या हत्याराने कोंडीत पकडू पाहात आहे याचा कडवा विरोध केला पाहिजे असे ठरविले.

या निर्णयातूनच, पंजाबमधील गहूक्षेत्र कमी करण्याचा निर्धार झाला. या निर्णयाची माहिती देतांना भारती किसान यूनियनच्या मानसाहेबांनी म्हटले, 'शासनाने गहू आयात करायलाही आमचा विरोध नाही; पण मग आमची मागणी इतकीच आहे की सरकारने जाहीर केलेल्या तथाकथित धोरणानुसार येथील शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठेत गहू विकण्यावर असलेले निर्बंध सरकारने उठवावे. सध्या, निर्यात करायला बंदी आहे आणि गव्हाला उत्पादनखर्चाइतकी किंमत द्यायला सरकार तयार तर नाहीच, वर ती मिळू नये यासाठी आयात, राज्यबंदी असे मार्ग सरकार वापरीत आहे अशा परिस्थितीत गहूक्षेत्र कमी करणे एवढाच पर्याय शेतकऱ्यांपुढे राहिला आहे.''

न्हावा-शेवा येथील बंदराच्या नाकेबंदीच्या आंदोलनात गुजरात, पंजाब, हरियाणा येथील शेतकरी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांबरोबर सहभागी होणार असल्याचे त्या राज्यांच्या प्रतिनिधींनी सांगितले.

■■■

# आरळ येथे रास्ता रोको

पूर्णा पाटबांधाऱ्याच्या क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या शेतात उभ्या असलेल्या गव्हाच्या पिकाचे पाणी तोडण्याचा निर्णय शासनाने ऐनवेळी घेतल्यामुळे परभणी जिल्ह्यातील आरळ येथे शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी तीन तास रास्ता रोको आंदोलन केले. या आंदोलन एक हजार स्त्री पुरुषांनी भाग घेतला.

मागील थकबाकीचे कारण दाखवून उभ्या पिकाचे पाणी तोडण्यापेक्षा शासनाने जर पेरणीआधीच तशी सूचना दिली असती तर शेतकऱ्यांनी पेरणीसंबंधी योग्य तो निर्णय घेतला असता. शासनाची आताची कारवाई ही शेतकऱ्याच्या अपत्यवत पिकाचे पाणी तोडून त्याला कोंडीत पकडण्याची - लहान मुलांचे अपहरण करून पैसे वसूल करणारांसारखी आहे. म्हणून शेतकऱ्यांनी हे आंदोलन केले. पोलिसांनी कार्यकर्त्यांना अटक करून जागीच सोडून दिले.

प्रेषक : श्री. रामकिशन अप्पा रुद्राक्ष, जवळाबाजार

# यवतमाळ येथून 'गावबंदी' कार्यक्रमाचा आरंभ

दि. १० नोव्हेंबर १९९२ रोजी यवतमाळ येथे शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र शासनाचे मंत्री सर्वश्री जवाहरलाल दर्डा, बाबासाहेब केदार व रोहिदास पाटील हे राज्य कर्मचारी संघाच्या अधिवेशनास आले असतां त्यांना गावबंदी केली. श्री. बाबासाहेब केदार यांनी भाषण सुरू करताच कार्यकर्त्यांनी त्यांना शेतीमालाचे भाव, कापसाचा बोनस, कापूसबिलातील कपात, ज्वारी खरेदीतील तूट इत्यादी विषयांवर प्रश्न विचारून त्यासंबंधीच बोलावे असा आग्रह धरला. शेतकरी महिला आघाडीच्या धडाडीच्या कार्यकर्त्या सौ. संध्याताई इंगोले यांनी व्यासपीठावर जाऊन या. प्रश्नासंदर्भात पत्रक वाटले. पण या प्रश्नांवर बोलण्यास मंत्री तयार होईनात हे पाहाताच शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी घोषणा देण्याची सुरुवात केली. त्यानंतर पोलिसांनी सर्वश्री नितीन देशमुख (जि. प्र.), बबन चौधरी, राजेंद्र झोटींग, प्रदीप ठाकरे, रविंद्र गुल्हाने, बाबासाहेब येवतीकर, सुरेश पाटील, बाबाराव दिवाणजी, यू. एस्. जयस्वाल, सुरेशचंद्र अग्रवाल, सौ. संध्याताई इंगोले व सौ. वृषालि धाडगे (जि. प. सदस्य) यांना अटक केली.

## हॉ हॉ हॉ

देशोदेशी परकीय चलनाची भीक मागणारे इंडिया शासन देशामध्ये (इतर) कोणीही भीक मागू नये यासाठी कडक कायदा करणार आहे, असे कळते.

## मुक्ताफळे

अखिल भारतीय इंदिरा काँग्रेसचे सरचिटणीस सुशिलकुमार शिंदे म्हणाले की पंडीत जवाहरलाल नेहरूंनी आखलेल्या नियोजनास दिशा होती. आता त्याविरुद्ध काहूर उठविण्याचे कारण नाही.
(ते खरे, पण मग मागच्या ४० वर्षात नेमके चुकले काय?)

# इंडियातून आयात होणाऱ्या अंड्यांना बांगला देशातील शेतकऱ्यांचा विरोध

बांगलादेश सरकारने यंदा इंडियातून अंड्यांची आयात करमुक्त केल्याने हल्ली दररोज ४० लाख अंडी बांगला देशात जातात. त्यामुळे बांगला देशातील पाच हजारावर पोल्ट्री फार्म्सच्या समोर बिकट समस्या उभी राहिली आहे. अंड्यांच्या करमुक्त आयातीने बांगला देशातील अंड्यांचे भाव धडाधड कोसळले असून आधी ४२ ते ४४ टका डझनने मिळणाऱ्या अंड्यांना आता जेमतेम ८ ते १२ टका मिळतात. बांगला देशातील अंडीउत्पादक शेतकऱ्यांमध्ये त्यामुळे असंतोष निर्माण झाला असून कोणत्याही क्षणी आंदोलनाचा भडका उडण्याची शक्यता आहे.

**परिणामतः, इंडियात अंड्यांच्या किंमती (अंडी उत्पादकांना मिळणाऱ्या नव्हे, ग्राहकांना द्याव्या लागणाऱ्या) भडकल्या असतील हे सांगायला नकोच.**

**शासन कदाचित खुलासा करेल की इंडियातील गरीबांना कोलेस्टोरलचा त्रास होऊ नये म्हणून ही कारवाई केली आहे!**

# न्हावा-शेवा नाकेबंदीच्या तयारीसाठी शरद जोशींचा महाराष्ट्र-दौरा सुरू

नेहरूनीतीने होणाऱ्या गहू आयातीचा विरोध करण्यासाठी शेतकरी संघटनेतर्फे होणाऱ्या न्हावा-शेवा बंदराच्या नाकेबंदी कार्यक्रमाच्या तयारीसाठी शेतकरी संघटनेचे नेते श्री. शरद जोशी महाराष्ट्रव्यापी दौरा दिनांक १४ नोव्हेंबर १९९२ पासून सोलापूर जिल्ह्याच्या धोत्रा या गावापासून सुरू झाला असून ते जिल्ह्याजिल्ह्यातील कार्यकर्त्यांच्या बैठका तसेच वार्ताहर परिषदा घेऊन त्यामध्ये खुल्या अर्थव्यवस्थेच्या संदर्भात शेतकरी संघटनेच्या न्हावा-शेवा बंदर नाकेबंदी, मंत्र्यांना गावबंदी, नेहरूनीती प्रतिमेचे दहन या आंदोलन-कार्यक्रमाची भूमिका स्पष्ट करून सांगत आहेत. न्हावा-शेवा येथील कार्यक्रम दिनांक ९ डिसेंबर १९९२ पासून सुरू होणार असून या कार्यक्रमात १२ डिसेंबर रोजी या बंदराचे नेहरू बंदर असे असलेले नाव बदलून ते "सरखेल कान्होजी आंग्रे" असे देण्यात येईल.

## दौऱ्याचा दिनक्रम

| | |
|---|---|
| २१ नोव्हेंबर ९२ | नांदेड |
| २२ नोव्हेंबर ९२ | परभणी |
| २३ नोव्हेंबर ९२ | जालना |
| २४ नोव्हेंबर ९२ | औरंगाबाद |
| २५ नोव्हेंबर ९२ | बुलढाणा |
| २६ नोव्हेंबर ९२ | अकोला (विदर्भ) |
| २७ नोव्हेंबर ९२ | अमरावती |
| २८ नोव्हेंबर ९२ | यवतमाळ |
| २९ नोव्हेंबर ९२ | चंद्रपूर** |
| ३० नोव्हेंबर ९२ | नागपूर*** |
| १ डिसेंबर ९२ | वर्धा |
| २-३ डिसेंबर ९२ | पनवेल, अलिबाग न्हावा-शेवा परिसर |
| ४ डिसेंबर ९२ | जळगाव |
| ५ डिसेंबर ९२ | धुळे |
| ६ डिसेंबर ९२ | नाशिक**** |

* सांगली येथील बैठकीत सातारा जिल्ह्यातील कार्यकर्ते सहभागी.

** चंद्रपूर येथील बैठकीत गडचिरोली जिल्ह्यातील कार्यकर्ते सहभागी.

*** नागपूर येथील बैठकीत भंडारा जिल्ह्यातील कार्यकर्ते सहभागी.

**** नाशिक येथील बैठकीत अहमदनगर जिल्ह्यातील कार्यकर्ते सहभागी.

दौऱ्यातील बैठका व वार्ताहर परिषदा आयोजित करण्याच्या बाबतीत जिल्हाप्रमुखांना मार्गदर्शन व मदत करण्यासाठी सर्वश्री पाशा पटेल, शंकर धोंडगे व राम नेवले या कार्यकारिणी-सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

| | |
|---|---|
| पाशा पटेल : | सोलापूर, कोल्हापूर, सांगली, उस्मानाबाद, लातूर, अंबाजोगाई |
| शंकर धोंडगे : | नांदेड, परभणी, जालना, औरंगाबाद, जळगाव, धुळे, नाशिक. |
| राम नेवले : | विदर्भातील सर्व जिल्हे |

■■■

## शेतकरी हुतात्मादिन, दहा नोव्हेंबरपासून
# मंत्र्यांना गावबंदी

नमुना प्रश्न

* कारखानदारीला खुल्या अर्थव्यवस्थेचा लाभ मग शेतीवरच बंधने का?
* उसाला टनामागे ४५० रुपयांहून अधिक भाव देता येत असेल तर तो शेतकऱ्यांना का मिळू द्यायचा नाही?
* कपाशीची हमी किंमत कधी जाहिर करणार?
* हमी भाव व आधारभूत भाव एकच असेल तर एकाधिकार काय म्हणून?
* शेतीमालाची खरेदी केंद्रे उघडण्यास विलंब किंवा टाळाटाळ का?
* देशात गहू मुबलक असतांना देशातील शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या किमतीच्या दुप्पटीहून जास्त खर्च करून गहू आयात करणे ही शासनाने शेतकऱ्यांविरुद्ध सुरू केलेली लढाईच नाही का?
* या लढाईत तुम्ही कोणाचे प्रतिनिधी? लुटारू शासनाचे की अन्नदात्या शेतकऱ्याचे?
* उद्या जर, शेतकऱ्यांनी नाही केला पेरा, तर तुम्ही प्रजेला खाऊ काय घालाल, धत्तुरा?
* 'शेतीमालाला रास्त भाव' हे तत्त्व सगळेच मान्य करतात, मग तो मिळू नये म्हणून होणाऱ्या कटकारस्थानात सामील का राहातात?

# नऊ डिसेंबरपासून न्हेरू बंदराची नाकेबंदी
# बारा डिसेंबरपासून न्हावा-शेवा येथील बंदरास 'सरखेल कान्होजी आंग्रे' यांचे नाव

देशातील शेतकऱ्यांना कमी भाव देऊन परदेशातील महागाईचा गहू देशाच्या बाजारपेठेत ओतण्याच्या सरकारी धोरणाला विरोध म्हणून शेतकरी संघटनेने जाहीर केलेल्या 'बंदरांची नाकेबंदी' या कार्यक्रमाचा भाग म्हणून दि. ९ डिसेंबर १९९२ पासून महाराष्ट्रातील शेतकरी न्हावा-शेवा येथील बंदराची नाकेबंदी करून या बंदरातून किंवा बंदराकडे होणारी वाहतूक बंद पाडतील.

शेतकरी संघटनेचे नेते श्री. शरद जोशी यांनी आपला महाराष्ट्रव्यापी दौरा सोलापूर जिल्ह्यापासून सुरू करतांना १४ नोव्हेंबर १९९२ रोजी दक्षिण सोलापूर तालुक्यातील धोत्री या गावी झालेल्या जाहीर सभेत ही घोषणा केली.

गेली ४० वर्षे ज्या शेतकरी विरोधी नीतीने देशातील शेतकऱ्यांना कंगाल आणि कधीकाळी सुवर्णभूमी असलेल्या भारत देशाला भिकारी बनविले. त्या नीतीचे उद्गाते, देशाचे प्रथम पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचेच नाव न्हावा-शेवा येथील बंदरास दिलेले आहे. बंदराची नाकेबंदी करण्यास जमलेले लाखो शेतकरी १२ डिसेंबर ९२ रोजी या बंदराला शेतकरीद्वेष्ट्या नेहरूंचे दिलेले नाव रद्द करून त्याला शेतकऱ्यांचा राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आरमाराची स्थापना करणाऱ्या 'सरखेल कान्होजी आंग्रे' यांचे नाव देतील अशीही घोषणा त्यांनी आपल्या भाषणात केली.

हुतात्मा बाबू गेनू यांच्या स्मृतीदिनी होणाऱ्या या नामकरण समारंभाच्या वेळी ही नाकेबंदी पुढे किती दिवस चालू ठेवायची ते ठरविण्यात येईल.

# आदेश. आदेश.. आदेश...

इंडिया शासनाने नेहरूनीतीच्या घातक शस्त्राने शेतकऱ्यांची दुर्दशा करायचा विडाच उचलला आहे. आज गहू आयात होत आहे उद्या ज्वारीही येण्याची शक्यता आहे परवा तांदूळही. शत्रू अधिक पुढे यायच्या आत टोला मारला पाहिजे. त्यासाठी न्हावा-शेवा बंदराची नाकेबंदी. दि. ९ डिसेंबर १९९२ पासून.

* सर्व शेतकरी भावाबहिणींनी पहिल्या दिवसापासूनच हजर राहावे.
* न्हावा-शेवा येथे जाण्यासाठी कल्याणमार्गे पनवेलपर्यंत रेल्वेने जाता येते. तेथून ट्रकने बंदरापर्यंत नेण्याची व्यवस्था राहील.
* येतांना तीनचार दिवसांचे तयार खाद्यपदार्थ आणि थोडा शिधा, पाण्यासाठी प्लॅस्टिक कॅन, स्वयंपाकाची भांडी, पुरेसे अंथरुण पांघरूण घेऊन येणे.
* शक्य असेल त्यांनी तंबूचे सामान आणावे.
* ज्यांना शक्य होईल त्यांनी ट्रक घेऊन यावे.
* घरून निघाल्यानंतर थेट न्हावा-शेवा येथेच पोहोचावे.
* निघण्याआधी आपल्या जिल्हाप्रमुखांशी संपर्क साधावा. त्यांच्याकडून सविस्तर सूचना मिळतील.

– शेतकरी संघटना

# व्यथा

*चुन भाकर मिळे ना घरी*
*मी नावाचा शेतकरी*
*शेती करणे माझे काम*
*पाण्यासारखा माझा घाम*
*तरी मिळत नाही दाम*
*भाव मिळेना मला कधी*
*खोटी सरकार झाली खरी*
*मी नावाचा शेतकरी*

*आपल्या नशिबात हायब्रीड ज्वार*
*त्यांच्यासाठी आहे दरबार*
*दररोज पाहीजे बिअरबार*
*अधिक पाहीजे अंडाकरी*
*आपल्या नशिबात पंढरपुरी*
*मी नावाचा शेतकरी*

*बघा बघा नेहरू नीती*
*वाटते जमिल मला भीती*
*कशी वाहू मी आता शेती*
*कष्ट करतो मी कीती तरी*
*मी नावाचा शेतकरी*

**अ. जभील अ. खलील**
मु. पो. पणत
ता. अकाटे, जि. अकोला

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 21st, November 1992

To

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
November 21, 1992

**PNCW 281**
Licence
to post
without
prepayment
**No. 87**

# बंदर पे हम गद्दार गेहूँ रोकेंगे।

शेतकरी संघटना

## दि. ९ नोव्हेंबर १९९२ पासून

**दि. १२ डिसेंबर १९९२ हुतात्मा बाबू गेनू**
**स्मृति दिन न्हावा-शेवा बंदरास असलेले**
**नेहरूंचे नाव रद्द करून 'सरखेल कान्होजी आंग्रे' हे नाव देण्याचा समारंभ.**

**पाक्षिक शेतकरी संघटक**
मालक – मोहन बिहारीलाल परदेशी
मुद्रण स्थळ – गणेश प्रिंटर्स,
६९३, बुधवार पेठ, पुणे - २.

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
फोन : द्वारा - चाकण २३५४, २४६८

६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.
प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता
अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)
ता. खेड, जि. पुणे.